पुणे महानगरपालिका
मा.प्रशासक
पुणे महानगरपालिका

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:१६/०१/२०२५

**पुणे महानगरपालिका**
**स्थायी समिती**
**कार्यपत्रिका क्र.४१**

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **शुक्रवार, दि.१७/०१/२०२५ रोजी, दुपारी ०४:१० ( चार वाजून दहा मिनिटे ) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय, चौथा मजला, पुणे महानगरपालिका भवन, शिवाजीनगर, पुणे** येथे भरेल.

मा. प्रशासक, पुणे महानगरपालिका यांचे निर्णयार्थ खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात येत आहेत.

**वृत्तांत कायम करणे.**

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र.१५२६**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.२, कार्यालय अधिनस्त असलेल्या औंध- बाणेर क्षेत्रीय, शिवाजीनगर- घोलेरोड व कोथरूड- बावधन क्षेत्रीय कार्यालय यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.०१/१२/२०२४ ते दि.३१/१२/२०२४ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.२/१४७०, दि.१०/०१/२०२५ चे पत्र.

## सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र.१५२७**

भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पदमजी चौक ते ए.डी. कॅम्प पर्यंत फुटपाथ विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. DHANESH PRAVIN GANDHI यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३२,६४,३८४/- पेक्षा ३.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३१,६६,४५२=४८ अधिक जी.एस.टी र.रु.५,६९,९६१/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.२९,७६८/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.२६,९१०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३७,९३,०९१=४८ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१४७२, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५२८**

सहकार नगर येथील ॲन्टग्रेड पेव्हिंग ब्लॉक ची सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. DATTAGURU CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३७,९३,७१५/- पेक्षा ३३.२५% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५,३२,३०४=७६ अधिक जी.एस.टी र.रु.४,५५,८१५/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.२३,०९०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३०११२०९=७६ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१४७३, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५२९**

प्रभाग क्र. ३१ स.नं. ९ येथील बाबासाहेब पुरंदरे मल्टीपरपज हॉल येथील उर्वरित काम व पोहोच रस्ता करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SADGURU CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४०,१७,५०२/- पेक्षा २९.९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२८,१२,६५३=१५ अधिक जी.एस.टी र.रु.५,०६,२७८/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.३१,१३०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.२,२०,०४५/- पर्यंत अशी एकूण र.रु.३५,७०,१०६=१५ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१४७४, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५३०**

पुणे मनपा मध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या गुजर निंबाळकरवाडी गावामध्ये रस्ते विकसित करणे, दुरुस्ती करणे व इतर तद कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. Kashinath Sitaram Kumawat यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३३,४७,७१६/- पेक्षा २५.८८% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२४,८१,३२७=१ अधिक जी.एस.टी र.रु.४,४६,६३९/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.३९,२३७/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.५,३६५/- पर्यंत अशी एकूण र.रु.२९,७२,५६८=१ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१४७६, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५३१**

भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत बागवे कमान ते राममंदिर फायरब्रिगेड पर्यंत फुटपाथ विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. VAISHNAVI ASSOCIATES यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३२,६४,३८४/- पेक्षा ३.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३१,६६,४५२=४८ अधिक जी.एस.टी र.रु.५,६९,९६१/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.२९,७६८/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.२६,९१०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३७,९३,०९१=४८ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१४७७, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५३२**

धानोरी स.नं. ५ ते चऱ्होली हद्द डी.पी. रस्ता मिसिंग लिंक विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. PCC INFRASTRUCTURE PVT LTD यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२,०८,४९,७८२/- पेक्षा २३.६२% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,५९,२५,०६३=४९ अधिक जी.एस.टी र.रु.२८,६६,५११/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.३,८५,२३३/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.१०,९९०/- पर्यंत अशी एकूण र.रु.१,९१,८७,७९७=४९ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१४७८, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५३३**

उरुळी देवाची शेवाळेवाडी ते कीस्टोन स्कूल जवळून होळकरवाडी कडे जाणारा मुख्य रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Shreyas Construction यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८०,७७,८२४/- पेक्षा ८.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७४,३१,५९८=०८ अधिक जी.एस.टी र.रु.१३,३७,६८८/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.४,२१,५५१/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.४६,०१०/- पर्यंत अशी एकूण र.रु.९२,३६,८४७=०८ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१४७९, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५३४**

पुणे मुंबई हायवे च्या पश्चिमेकडील बाणेर परिसरातील सेवा रस्ते विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. GAJUL CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६६,२७,३६३/- पेक्षा १९.९१% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५३,०७,८५५=०३ अधिक जी.एस.टी र.रु.९,५५,४१४/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.१,२८,४११/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.४७,१६०/- पर्यंत अशी एकूण र.रु.६४,३८,८४०=०३ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१४८१, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५३५**

पुणे महानगरपालिकेच्या वर्ग-१, वर्ग-२ व वर्ग-३ अधिकारी व कर्मचारी यांचे मानसिक आरोग्य राखणे व मनोबल उंचावणेकरिता मेंटल हेल्थ ॲप वापरणे बाबत निविदा मागविली असता आलेल्या ३ निविदांपैकी निविदाधारक टचकिन इसर्व्हिसेस प्रा.लि. यांची निविदा सर्वात कमी रकमेची (तडजोडीने प्रति युनिट परवाना रक्कम रु.६,३७२/- (२००० परवानेकरिता)) असल्याने त्यांचेकडून २००० परवानेकरीता (युनिट) एकूण र.रु.१,२७,४४,०००/- (सर्व करांसहित) दोन वर्षाकरीता सदरचा खर्च सीएसआर निधी अंतर्गत प्राप्त निधी बँक खाते क्र.६०३५५२७२८४८ या अर्थशीर्षकामधून खर्च करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१४८२, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५३६**

पुणे मनपा मध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या वडाचीवाडी गावामध्ये रस्ते विकसित करणे, दुरुस्ती करणे व इतर तद कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/S SOHAM SANJAY KATE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३३,५१,६०९/- पेक्षा २७.१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२४,४३,३२२=९६ अधिक जी.एस.टी र.रु.४,३९,७९८/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.३८,२६४/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.५,३६५/- पर्यंत अशी एकूण र.रु.२९,२६,७४९=९६ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१४८४, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५३७**

नर्सरीच्या वाढीसाठी रोपे, उपकरणे, खते, साहित्य खरेदी व दुरुस्ती देखभाल तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. रवी नर्सरी यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२९,९९,४००/- पेक्षा १.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२९,६९,४०६/- पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/वृक्ष प्राधिकरण/१४९७, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५३८**

शिक्षण विभाग (प्राथमिक), पुणे मनपा संचलित क्रीडानिकेतन शाळांतील विद्यार्थ्यांना अल्पोपहार व भोजन व्यवस्था पुरविणे कामी निविदा मागविली असता आलेल्या २ निविदांपैकी निविदाधारक मे. श्रीराम व्यवसाय गट यांची निविदा दोघात कमी दराने (पु.ग.प. रकमेच्या २०.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४,२०,७०,४००/-(सर्व करांसह) पर्यंत काम करून घेणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस, तसेच त्यापोटी होणारे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भांडार/१४९९, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५३९**

उप आयुक्त क्र.३ अंतर्गत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विविध उद्यानात स्थापत्य विषयक सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. G S BUILDCON यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३३,६०,२५२/- पेक्षा २९.५२% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२३,६८,३०५=६१ अधिक जी.एस.टी र.रु.४,२६,२९५/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.३४,८८५/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.२८,२९,४८५=६१ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उद्यान/१५००, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५४०**

नवले ब्रिज ते वडगाव ब्रिज दरम्यानचा सर्व्हिस रस्ता विकसित करणे (पार्ट २) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. JAGSON BUILDCON यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६५,९१,११६/- पेक्षा २१.२५% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५१,९०,५०३=८५ अधिक जी.एस.टी र.रु.९,३४,२९१/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.१,८७,६०६/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.३४,५७५/- पर्यंत अशी एकूण र.रु.६३,४६,९७५=८५ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१५०२, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५४१**

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे मनपाच्या प्राथमिक शाळांकरिता फर्निचर साहित्य खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. शेख जुनेद अहेमद खालील अहेमद यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (पु.ग.प. रकमेपेक्षा ०.५६०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४९,७०,७२३=१९ (सर्व करांसह) पर्यंत काम करून घेणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस, तसेच त्यापोटी होणारे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भांडार/१५०६, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५४२**

पुणे महानगरपालिकेच्या विद्युत विभागासाठी GI पोल खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/S Magnetic Elect and Electronics यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (पु.ग.प. रु.रु.४,७२,५०,०००/- रकमेपेक्षा १.६८०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४,६९,२६,८०९=२९ (सर्व करांसह) पर्यंत काम करून घेणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस, तसेच त्यापोटी होणारे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भांडार/१५०९, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५४३**

रामटेकडी, हडपसर येथील १० एम.एल.डी. मैलापाणी शुद्धीकरण केंद्राला वीजपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. MORESHWAR ELECTRICAL CORPORATION यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३३,०१,७२८/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा २३.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५,४२,३३०=५६ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रु.४,५७,६२०/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.२९,९९,९५०=५६ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम वर्क ऑर्डर पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१५१८, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५४४**

पुणे महानगरपालिकेच्या विठ्ठलवाडी, एरंडवणा, बोपोडी, बाणेर, तानाजीवाडी इ मैलापाणी शुद्धीकरण केंद्र येथे निर्जंतुकीकरण करणेसाठी वापरण्यात येणाऱ्या क्लोरीन डायऑक्साईड (CLO2) पावडरचा आवश्कतेनुसार पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. GIRIRAJ TRADING COMPANY यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४,४६,६८०/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा १.०% ने जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.८५,३१,१४६=८ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रु.१५,३५,६०६/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.१,००,६६,७५२=८ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम ब पाकीट उघडलेचे दिनांक (२६-०९-२०२४) पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१५१९, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५४५**

पुणे महानगरपालिकेच्या नवीन नायडू बहिरोबा, मुंढवा, खराडी, इ. मैलापाणी शुद्धीकरण केंद्र येथे निर्जंतुकीकरण करणेसाठी वापरण्यात येणाऱ्या क्लोरीन डायऑक्साईड (CLO2) पावडरचा आवश्कतेनुसार पुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SVS Chemical Corporation LLP यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४,१९,९५०/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा १.००% ने जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.८५,०४,१४९=५ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रु.१५,३०,७४७/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.१,००,३४,८९६=५ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम ब पाकीट उघडलेचे दिनांक (२६-०९-२०२४) पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१५२०, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५४६**

पुणे मनपाच्या डॉ. नायडू हॉस्पिटल येथे विकसित होणाऱ्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी मेडिकल कॉलेज (द्वितीय वर्ष) येथील विविध क्लास रूम, लॅब मध्ये इन्ट्रॅक्टीव्ह डिस्प्ले बोर्ड पुरविणे, बसविणे व चालू करून देणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. ACE BRAIN SYSTEMS AND SOFTWARE PVT.LTD यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४१,३३,६००/- (अधिक जी.एस.टी.) पेक्षा ९.९९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३७,२०,६५३=३६ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रु.६,६९,७१८/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४३,९०,३७१=३६ पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम वर्क ऑर्डर पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१५२१, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५४७**

खडकवासला जॅकवेल (पर्वती रॉ वॉटर पंपिंग) येथे २२ के.व्ही. पॅनेल पुरविणे, बसविणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. M/S. JVS ENGINEERING यांचे एकच टेंडर आले असल्याने (टेंडर र.रु.६८,०५,७५२/- पेक्षा ९.१०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६१,८६,४२८=५७ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रु.११,१३,५५७/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.७२,९९,९८५=५७ पर्यंत तसेच वर्क ऑर्डर दिनांकापासून काम सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१५२२, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

## संकीर्ण

**विषय क्र.१५४८**

टार्गेट पब्लिकेशन्स प्रा.लि यांचेकडून शिक्षण विभाग, पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांतील बालवाडीसह इयत्ता १ली ते ८वीच्या विदयार्थ्यांकरिता १) मुलभूत शिक्षण व लेखन साहित्य, २) कला व कार्यानुभव पुस्तिका आणि ३) जादूई पिटारा इत्यादी विदयार्थी उपयोगी साहित्य विदयार्थ्यांना देणेबाबत रक्कम रूपये ६,१५,४७,२००/- खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प्राथमिक शिक्षण मं/१४६९, दि.१०/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **प्राथमिक शिक्षण विभाग,<br>पुणे मनपा** | र.रु.६१५४७२०० /- | --- |
| **नवीन सुचविलेली कामे:-<br>प्राथमिक शिक्षण विभाग** | --- | |
| १) बालवाडीच्या विदयार्थ्यांना मुलभूत शिक्षण व लेखन साहित्य पुरविणे | --- | र.रु.२०४०००००/- |
| २) इयत्ता 1ली ते 8 वीच्या विदयार्थ्यांना कला व कार्यानुभव विषयाच्या पुस्तिका उपलब्ध करून देणे | --- | र.रु.३५२००००००/- |
| ३) बालवाडीच्या विदयार्थ्यांना जादूई पिटारा पुरविणे | --- | र.रु.५९४७२००/- |

**विषय क्र.१५४९**

सुस गावठाणात नंदू चांदेरे यांच्या घरामागील विद्युत भूमिगत केबल टाकणे या कामासाठी र.रु.२५ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१४७१, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **मुख्य अभियंता (विद्युत)**<br>सन २०२४-२५ अंदाजपत्रकिय तरतूद<br>पान क्र.१४९, पुणे शहरातील विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे<br>CE20A102/A2-2042<br>र.रु.९०००.०० लक्ष | २५ लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम:-<br>मुख्य अभियंता (विद्युत)** | | |
| १) सुस गावठाणात नंदू चांदेरे यांच्या घरामागील विद्युत भूमिगत केबल टाकणे. | --- | २५ लक्ष |

**विषय क्र.१५५०**

४७६, भवानी पेठ, पुणे येथील समाजमंदिराच्या ठिकाणी पुणे महानगरपालिका समाज विकास विभाग व भवानी पेठ (हरकानगर) मेहतर-बाल्मिकी समाज पंचायत, पुणे या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक उपक्रम राबविणे साठी खालील बाबींस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/समाजविकास/१४७५, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

१. ४७६, भवानी पेठ, पुणे येथील समाजमंदिराच्या ठिकाणी पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग व भवानी पेठ (हरकानगर) मेहतर बाल्मिकी समाज पंचायत, ४७५, श्रीराम मंदिर, भवानी पेठ, हरकानगर, पुणे ४११०४२ या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक उपक्रम ५ वर्ष कालावधीकरीता राबविणेस. भवानी पेठ (हरकानगर) मेहतर बाल्मिकी समाज पंचायत, ४७५, श्रीराम मंदिर, भवानी पेठ, हरकानगर, पुणे ४११०४२ या संस्थेसमवेत करारनामा करणेस.

२. सदर जागेपोटी निश्चित केलेल्या भाडे दरापेक्षा (रक्कम रू.६,९७८/-) जास्त रक्कम देण्यास तयार असल्याने भवानी पेठ (हरकानगर) मेहतर-बाल्मिकी समाज पंचायत, ४७५, श्रीराम मंदिर, भवानी पेठ, हरकानगर, पुणे ४११०४२ या संस्थेकडून मासिक भाडे रक्कम रू.७,६५०/- आकारणी करणेस. तसेच करारनामा करतेवेळी संस्थेकडून अनामत रक्कम (तीन महिनेचे भाडे) रू.२२,९५०/- व तीन महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम रू.२२,९५०/- आकारणी करणेस.

३. पुणे महानगरपालिका मिळकत /जागा वाटप नियमावली सन २००८ मधील भाग १० (२३) मधील २ नुसार व्यवस्थापन व देखभाल यावरील येणारा खर्च भागविण्यासाठी योग्य ते शुल्क मा. महापालिका आयुक्त यांचे पुर्व परवानगीने संस्थेमार्फत आकारणेस.

४. भवानी पेठ (हरकानगर) मेहतर बाल्मिकी समाज पंचायत, ४७५, श्रीराम मंदिर, भवानी पेठ, हरकानगर, पुणे ४११०४२ या संस्थेमार्फत सदर वास्तूचे संपुर्ण व्यवस्थापन, दुरूस्ती विषयक कामे करणेस.
५. समाज विकास विभागास आवश्यकता असल्यास सदर हॉल वापरण्यास देणेस.
६. प्रकल्पासाठी आवश्यक असलेले फर्निचर व्यवस्था, तदनुषंगिक साधन सामुग्री, प्रशिक्षित मनुष्यबळ इत्यादी बाबी भवानी पेठ (हरकानगर) मेहतर-बाल्मिकी समाज पंचायत, ४७५, श्रीराम मंदिर, भवानी पेठ, हरकानगर, पुणे ४११०४२ या संस्थेमार्फत पुरविणेस.
७. सदर ठिकाणी प्रकाश व्यवस्था, पाण्याची व्यवस्था करणे, सदर मिळकतीची किरकोळ देखभाल दुरूस्ती करणे तसेच विविध सोयी व कोणत्याही प्रकारची देयक जसे की विज देयक अथवा इतर तत्सम देयक भवानी पेठ (हरकानगर) मेहतर-बाल्मिकी समाज पंचायत, ४७५, श्रीराम मंदिर, भवानी पेठ, हरकानगर, पुणे ४११०४२ या संस्थेकडून करणेस,
८. भवानी पेठ (हरकानगर) मेहतर बाल्मिकी समाज पंचायत, ४७५, श्रीराम मंदिर, भवानी पेठ, हरकानगर, पुणे ४११०४२ या संस्थेमार्फत पुणे मनपाकडे करार संपेपर्यंत वार्षिक संयुक्त प्रकल्प अहवाल प्रत्येक वर्षी समाज विकास विभागाकडे सादर करणेस.
९. समाज विकास विभागाकडील अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून वेळोवेळी भेटी देऊन सदरील सामाजिक उपक्रमाची माहिती घेणेस.
१०. सदर प्रकल्प राबविताना काही अनुचित प्रकार, घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी भवानी पेठ (हरकानगर) मेहतर बाल्मिकी समाज पंचायत, ४७५, श्रीराम मंदिर, भवानी पेठ, हरकानगर, पुणे ४११०४२ या संस्थेची राहणेस.
११. भवानी पेठ (हरकानगर) मेहतर-बाल्मिकी समाज पंचायत, ४७५, श्रीराम मंदिर, भवानी पेठ, हरकानगर, पुणे ४११०४२ या संस्थेने व्यवस्थित व समाधानकारक काम केले नाही तर संस्थेकडील जागा काढून घेणेस.

**विषय क्र.१५५१**

प्रभाग क्र.८ मधील औंध परिसरात नवीन ड्रेनेज लाईन टाकणे या कामांसाठी खालीलप्रमाणे र.रु.५० लक्ष वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.२/१४८०, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **मा.अधीक्षक अभियंता (मलनिःसारण देखभाल व दुरुस्ती विभाग)**<br>सन २०२४-२५ अंदाजपत्रकीय तरतूद, पान क.४४, जलोत्सारण विभागाकडील कामाच्या याद्या, यादी क्र.D2 शहरामध्ये मलवाहिन्या विकसित करणे,<br>प्रभाक क्र.८ मधील औंध परिसरात नवीन ड्रेनेज लाईन टाकणे.<br>ZE16B102/D2-740 | ५० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेली कामे:-**<br>**औंध बाणेर क्षेत्रीय कार्यालय** | | |
| १) प्रभाग क्र.८ अंतर्गत बोपोडी भागातील हॅरीस ब्रिज शेजारील जनता हॉटेल लगतची जुनी ड्रेनेज लाईन बदलणे. | --- | १० लक्ष |
| २) प्रभाग क्र.८ मधील आदर्शनगर व इतर ठिकाणी जुनी ड्रेनेज लाईन बदलणे. | --- | १० लक्ष |
| ३) प्रभाग क्र.८ मधील स.नं. ३९ औंध रोड व इतर ठिकाणी जुनी ड्रेनेज लाईन बदलणे. | --- | १० लक्ष |
| ४) प्रभाग क्र.८ मधील स.नं. २६ औंध रोड व इतर ठिकाणी जुनी ड्रेनेज लाईन बदलणे. | --- | १० लक्ष |
| ५) प्रभाग क्र.८ मधील स.नं. २५ औंध रोड व इतर ठिकाणी जुनी ड्रेनेज लाईन बदलणे. | --- | १० लक्ष |

**विषय क्र.१५५२**

पुणे महानगरपालिकेच्या कोंडवाडा विभागाकडे भाडे तत्त्वावर गुरेवाहक वाहने पुरविणे या कामासाठी खालीलप्रमाणे र.रु.२०० लक्ष वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/कोंडवाडा/१४८३, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **कोंडवाडा विभाग**<br>अंदाजपत्रकातील २०२४-२५ RE29A110 भाजी मंडई नवीन बांधकाम व देखभाल दुरुस्तीची कामे करणे मान्य उपलब्ध तरतूद र.रु.७००.०० | २०० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम:-**<br>**महात्मा फुले मंडई कार्यालय** | | |
| पुणे महानगरपालिकेच्या कोंडवाडा विभागाकडे भाडे तत्त्वावर गुरेवाहक वाहने पुरविणे | --- | २०० लक्ष |

**विषय क्र.१५५३**

लक्ष्मी ग्रीन काउंटी, खडकवस्ती, ओढा लगत कोंढवेश्वर मंदिर मशीद जवळून नदीपर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे व कोंढवेश्वर मंदिर ओढा ते कॅनल ड्रेनेज लाईन टाकणे या कामांकरिता खालीलप्रमाणे र.रु.९४ लक्ष वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मलनिःसारण/१४८५, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **मलनिःसारण विभाग**<br>पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुद्धीकरण केंद्र उभारणे<br>ZE16B102/D2-612 एकूण र.रु. ८००० लक्ष पैकी मा. वित्तीय समितीने मान्य केलेली तरतूद र.रु.५० लक्ष | ९४ लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेली कामे:-**<br>**मलनिःसारण विभाग** | | |
| लक्ष्मी ग्रीन काउंटी, खडकवस्ती, ओढा लगत कोंढवेश्वर मंदिर मशीद जवळून नदीपर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे व कोंढवेश्वर मंदिर ओढा ते कॅनल ड्रेनेज लाईन टाकणे | --- | ९४ लक्ष |

**विषय क्र.१५५४**

प्रभाग क्र. १३ मधील हॅप्पी कॉलनी, गोसावी वस्ती, सहवास सोसायटी, नवसह्याद्री पटवर्धन बाग, एरंडवणे, प्रभात रोड, राहुल नगर परिसर, सिटी प्राइड, गणेश नगर लॉ कॉलेज रोड, कॅनल रोड भागात ड्रेनेज लाईन दुरुस्ती किंवा नवीन टाकणे या कामासाठी खालीलप्रमाणे र.रु.५० लक्ष वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मलनिःसारण/१४८६, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **मलनिःसारण देखभाल व दुरुस्ती विभाग**<br>पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाइन विकसित करणे व मैलापाणी शुद्धीकरण केंद्र उभारणे<br>ZE16B102/D2-612<br>एकूण र.रु.८०.०० कोटी पैकी मा. वित्तीय समितीने मान्य केलेली तरतूद - र.रु.५०.०० लक्ष | ५० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम:-**<br>**मलनिःसारण देखभाल व दुरुस्ती विभाग** | | |
| प्रभाग क्र. १३ मधील हॅप्पी कॉलनी, गोसावी वस्ती, सहवास सोसायटी, नवसह्याद्री पटवर्धन बाग, एरंडवणे, प्रभात रोड, राहुल नगर परिसर, सिटी प्राइड, गणेश नगर लॉ कॉलेज रोड, कॅनल रोड भागात ड्रेनेज लाईन दुरुस्ती किंवा नवीन टाकणे | --- | ५० लक्ष |

**विषय क्र.१५५५**

प्रभाग क्र ३१ मधील झोपडपट्टी वस्ती भागात ड्रेनेज व काँक्रीटीकरण विषयक कामे करणे या कामाकरिता खालीलप्रमाणे र.रु.५० लक्ष वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मलनिःसारण/१४८७, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **मलनिःसारण विभाग**<br>पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुद्धीकरण केंद्र उभारणे<br>ZE16B102/D2-612 एकूण र.रु. ८००० लक्ष पैकी मा. वित्तीय समितीने मान्य केलेली तरतूद र.रु.५० लक्ष | ५० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम:-**<br>**मलनिःसारण विभाग** | | |
| प्रभाग क्र ३१ मधील झोपडपट्टी वस्ती भागात ड्रेनेज व काँक्रीटीकरण विषयक कामे करणे | --- | ५० लक्ष |

**विषय क्र.१५५६**

सन २०२४-२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड CE20A102/A2-1794-PPP मॉडेलवर डेव्हलपमेंट क्रेडिट नोट मोबदल्यामध्ये / Deffered payment तत्त्वावर शहरातील DP रस्ते व पूल / भुयारी मार्ग खाजगी सहभागातून विकसित करणे (सदर प्रकल्प चालू आर्थिक वर्ष व पुढील तीन आर्थिक वर्षाच्या कालावधीत विकसित होत आहेत.) या मूळ कामासाठी उपलब्ध असलेल्या र.रु.७५.०० कोटीतून प्रभाग क्र. २४ मधील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ५०.०० लक्षची एकूण ५ कामांसाठी खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे तरतूद उपलब्ध करुन मिळणेसाठी मा.स्थायी समिती

मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.४/१४८८, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **पथ विभाग**<br>सन २०२४-२५ चे अंदाजपत्रक बजेट कोड CE20A102/A2-1794-PPP मॉडेलवर डेव्हलपमेंट क्रेडिट नोट मोबदल्यामध्ये / Deffered payment तत्त्वावर शहरातील DP रस्ते व पूल / भुयारी मार्ग खाजगी सहभागातून विकसित करणे (सदर प्रकल्प चालू आर्थिक वर्ष व पुढील तीन आर्थिक वर्षाच्या कालावधीत विकसित होत आहेत.) या मूळ कामासाठी उपलब्ध असलेल्या र.रु.७५.०० कोटी | ५० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम:-**<br>**महापालिका सहाय्यक आयुक्त,**<br>**वानवडी रामटेकडी कार्यालय** | | |
| १) प्रभाग क्र. २४ मध्ये आलकुंटे चाळ परिसरात गल्लीबोळ कॉक्रिटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| २) प्रभाग क्र. २४ मध्ये शंकरमठ व गायकवाडचाळ परिसरात गल्लीबोळ कॉक्रिटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| ३) प्रभाग क्र. २४ शंकरमठ पवार चाळ परिसरात कॉक्रिटीकरण करणे. | --- | १० लक्ष |
| ४) प्रभाग क्र. २४ नवचैतन्य मित्र मंडळ जवळ इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. | --- | १० लक्ष |
| ५) प्रभाग क्र. २४ शंकरमठ विविध ठिकाणी इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. | --- | १० लक्ष |

**विषय क्र.१५५७**

सुशीला हॉटेल कोल्हेवाडी (सिंहगड रोड ते ढमाले चिकन सेंटर ओड्यापर्यंत ड्रेनेज लाईन करणे) (अंदाजे ६५० मीटर) या कामाकरिता खालीलप्रमाणे र.रु.३६ लक्ष वर्गीकरणानद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मलनिःसारण/१४८९, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **मलनिःसारण विभाग**<br>पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ठ २३ गावांमध्ये Master Plan नुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुद्धीकरण केंद्र उभारणे<br>ZE16B102/D2-612<br>एकूण र.रु. ८००० लक्ष पैकी मा. वित्तीय समितीने मान्य केलेली तरतूद र.रु.३६ लक्ष | ३६ लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम:-**<br>**मलनिःसारण विभाग** | | |
| सुशीला हॉटेल कोल्हेवाडी (सिंहगड रोड ते ढमाले चिकन सेंटर ओड्यापर्यंत ड्रेनेज लाईन करणे) (अंदाजे ६५० मीटर) | --- | ३६ लक्ष |

**विषय क्र.१५५८**

पुणे मनपाच्या विविध इमारतींच्या स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे या कामासाठी खालीलप्रमाणे र.र.१०० लक्ष वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/१४९१, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **भवन रचना विभाग**<br>बजेट कोड- CE11A129/J1-38<br>मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त यांचे निवासस्थान उभारणे. | १०० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेली कामे:-**<br>**भवन रचना विभाग** | | |
| १) पुणे मनपा मालकीच्या विविध इमारतीं मध्ये स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची व तदनुषंगिक कामे करणे. | --- | ६० लक्ष |
| २) पुणे मनपा मुख्य इमारत (जुनी व विस्तारित) येथे फर्निचर, प्लंबिंग व इतर देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे | --- | ४० लक्ष |

**विषय क्र.१५५९**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५२ मध्ये वसूल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेसाठी (निवासी व बिगर निवासी एकूण १२ प्रकरणे) खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत. मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/TAX/१४९२, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

१)कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडून यापूर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५२ प्रमाणे वसूल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेबाबत तयार करण्यात आलेली निवासी व बिगर निवासी व बखळ कराची एकूण १२ प्रकरणे व त्याची २०२४-२५ ची मागणी माहे जुलै २०२४ पर्यंतची थकबाकी अशी एकूण रक्कम रुपये रु.१,१३,४३,८१३/- निर्लेखित करणेबाबत कागदपत्रांची तपासणी करण्यात आली असून मिळकत कर रक्कम निर्लेखित करणेबाबत कार्यवाही करणेस.

२) सदरची निवासी व बिगर निवासी व बखळ कराची एकूण १२ प्रकरणे निर्लेखित केल्यानंतर नव्याने निर्लेखित करावयाच्या प्रकरणांची कागदपत्रे तपासून, जागा तपासणी करून प्रशासकीय मान्यता घेऊन पुढील प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करून त्याचा अहवाल स्थायी समितीस मान्यतेसाठी सादर करणेस.

**विषय क्र.१५६०**

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून सन २०२३ - २०२४ या आर्थिक वर्षात वितरीत करण्यात आलेल्या मोफत / सवलतीचे विविध बसपास पोटी रक्कम महामंडळास आदा करणेसाठी खालील बाबींस मा.स्थायी समिति मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/१४९३, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

१) PMPML संस्थेने सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात वितरीत केलेल्या मोफत / सवलतीचे विविध बसपास पोटी तपासणी अंती प्राप्त शिफारशी नुसार देय ठरणारी र.रु.२१,८३,०७,७८५/- (अक्षरी एकवीस कोटी त्र्याऐंशी लक्ष सात हजार सातशे पंच्याऐंशी रुपये मात्र) इतकी रक्कम PMPML संस्थेस पुणे महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ अंदाजपत्रकात (RE58A101B) "४८ क PMPML च्या विविध प्रकारच्या पासेसपोटी द्यावयाची रक्कम" या अर्थशीर्षकांतर्गत करण्यात आलेल्या तरतूदीमधून आदा करणेस पश्चात मान्यता मिळणेस,

२) उर्वरित सामान्य प्रशासन (आस्थापना) विभागाकडील तपासणी अंती प्राप्त शिफारशी नुसार देय ठरणारी रक्कम रु.५२,८४,३००/- PMPML संस्थेस पुणे महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ चे अंदाजपत्रकात (RE58A101B) "४८ - क PMPML च्या विविध प्रकारच्या पासेसपोटी द्यावयाची रक्कम" या अर्थशीर्षकांतर्गत करण्यात आलेल्या तरतूदीमधून आदा करणेस,

**विषय क्र.१५६१**

प्रभाग क्र. १० मधील बावधन मध्ये ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे. नवीन मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे, चेंबर दुरुस्त करणे या कामासाठी र.रु.२५ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.२/१४९४ , दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **मलनिःसारण विभाग**<br>सन २०२४-२५ अंदाजपत्रकीय तरतूद पान क्र. ३८ सन २०२३-२४ मधील अपूर्ण कामांसाठी सन २०२४-२५ मध्ये उपलब्ध केलेली तरतूद.<br>पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावे व २३ गावांमध्ये Master Plan नुसार पाणीपुरवठा करण्याची योजना १००००.०० ZE16C103/PR3-5 र.रु. १०००००० | २५ लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम:-**<br>**कोथरूड बावधन क्षेत्रीय कार्यालय** | | |
| प्रभाग क्र. १० मधील बावधन मध्ये ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे. नवीन मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे, चेंबर दुरुस्त करणे. | --- | २५ लक्ष |

**विषय क्र.१५६२**

पुणे महानगरपालिकेचे आर्किटेक्ट, हेरीटेज(कॉन्झर्वेशन) आर्किटेक्ट व इंटेरिअर डिझाईनर्सचे पॅनेलसाठी दि.०३/१२/२०२४ पासुन दि.०३/०६/२०२५ पर्यंत सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यासाठी खालील अटीस अधीन राहून खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/१४९६, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

१. ऑर्किटेक्टच्या पॅनेलसाठी जास्तीत जास्त २.०% या दराने मुशाहिरा मा. महा.आयुक्त यांच्या विषयपत्रातील अ.क्र. १ ते १३ अटी व शर्ती यांना अधिन राहून अदा करणेस.

२. हेरिटेज (कॉन्झर्वेशन) आर्किटेक्ट पॅनेलसाठी जास्तीत जास्त ५.०% या दराने मुशाहिरा मा. महा.आयुक्त यांच्या विषयपत्रातील अ.क्र. १ते १२ अटी व शर्ती यांना अधिन राहून अदा करणेस.

३. इंटेरिअर डिझायनर्सचे पॅनेलसाठी जास्तीत जास्त २.०% या दराने मुशाहिरा मा. महा.आयुक्त यांच्या विषयपत्रातील अ.क्र.१ ते १८. अटी व शर्ती यांना अधिन राहून अदा करणेस.

**विषय क्र.१५६३**

प्रभाग क्र.१८ मधील कान्होजी आंग्रे शाळेतील भवन इंटरलॉकिंग पेव्हर ब्लॉक बसविणे व दुरुस्ती करणे या कामासाठी र.रु.२५ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.५/१४९८, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **पथ विभाग**<br>सन 2024 - 25 चे अंदाजपत्रक बजेट कोड CE20A102/A21794 PPP मॉडेलवर डेव्हलपमेंट क्रेडिट नोट मोबदल्यामध्ये / Deffered payment तत्वावर शहरातील DP रस्ते व पूल / भुयारी मार्ग खाजगी सहभागातून विकसित करणे (सदर प्रकल्प चालू आर्थिक वर्ष व पुढील तीन आर्थिक वर्षाच्या कालावधीत विकसित होत आहेत.) या मुळ कामाची उपलब्ध तरतुद र. रू. 75.00 कोटी | २५ लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम:-**<br>**उप आयुक्त, परिमंडळ क्र.५** | | |
| प्रभाग क्र.१८ मधील कान्होजी आंग्रे शाळेतील भवन इंटरलॉकिंग पेव्हर ब्लॉक बसविणे व दुरुस्ती करणे | --- | २५ लक्ष |

**विषय क्र.१५६४**

परिमंडळ क्र. २ चे अखत्यारीतील क्षेत्रिय कार्यालयांतर्गत विधानसभा २०२४ करीता विविध मतदान केंद्रांवर स्थापत्य व विद्युत विषयक करण्यात आलेल्या कामास ६७ (३) (क) अन्वये खालील बाबींस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची पश्चात मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.२/१५०१, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

१)) महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अनुषंगाने परिमंडळ क्र. २ अंतर्गत येणारे औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालय, कोथरूड- बावधन क्षेत्रिय कार्यालय, शिवाजीनगर-घोले रोड क्षेत्रिय कार्यालयांतर्गत येणाऱ्या मतदान केंद्रावर स्थापत्य विषयक व विद्युत विषयक दुरुस्तीची कामे करणे कामे अतित्वर्य व विशेष बाब म्हणून मनपा अधिनियम १९४९ कलम ६७ (३) (क) नुसार केलेल्या कामास पश्चात मान्यता मिळणेस,

२) सदर दुरुस्ती विषयक कामाचा खर्च भवन विभाग पुणे महानगरपालिका यांनी क्षेत्रीय कार्यालय निहाय उपलब्ध करून दिलेल्या खालीलप्रमाणे बजेट हेड मधून करणेस व संबंधित ठेकेदारास बिनाकरार बिल अदा करणेस,

अ) औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत चे ठेकेदार मे. सोहन नागनाथ चव्हाण यांनी केलेल्या कामाचा र.रु.१९,८९,५९१=११ (१८% जी.एस.टी. सह) खर्च
सन २०२४-२५ मधील अंदाजपत्रकातील बजेट कोड - RE22B125 वर उपलब्ध झालेल्या तरतुदीतून अदा करणेस

ब) कोथरूड बावधन क्षेत्रिय कार्यालयांतर्गतचे ठेकेदार मे. समर्थ एंटरप्रायजेस यांनी केलेल्या कामाचा र.रु.१९,९९,७५८=०७ (१८% जी.एस.टी. सह) खर्च सन २०२४-२५ मधील अंदाजपत्रकातील बजेट कोड RE22B126 वर उपलब्ध झालेल्या तरतुदीतून अदा करणेस

क) घोले रोड क्षेत्रिय कार्यालयांतर्गत चे ठेकेदार मे. सागर सोमनाथ यादव यांनी केलेल्या कामाचा र.रु.१९,९८,८७०=३२ (१८% जी.एस.टी. सह) खर्च सन २०२४-२५ मधील अंदाजपत्रकातील बजेट कोड RE22B133 वर उपलब्ध झालेल्या तरतुदी अदा करणेस

३) मे. सोहन नागनाथ चव्हाण, मे. समर्थ एंटरप्रायजेस व मे. सागर सोमनाथ यादव या ठेकेदारामार्फत प्रत्यक्ष जागेवर झालेल्या कामांचे खर्चाचे प्रतिवृत्त मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेस.

**विषय क्र.१५६५**

लोकल पर्चेस व आर्थिक दुर्बल गटासाठी आरोग्य सहाय याजनेअंतर्गत परवानाधारक औषधे विक्रेत्याकडून अंशदायी सहाय्य योजनेअंतर्गत दैनंदिन स्वरुपात औषधे व इतर साहित्य खरेदी करणेकामी र.रु.१२ कोटी खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१५०३, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका**<br>७ रुग्णालये प्र. औषधालये इ. CE17A242/SJ6.93<br>भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय | १२ कोटी | --- |
| **नवीन सुचविलेले काम:-**<br>**आरोग्य कार्यालय** | | |
| सन २०२३-२४ ७ रुग्णालये प्र. औषधालये इ.<br>RE17F133A आर्थिक दुर्बल गटांसाठी आरोग्य सहाय्य योजने अंतर्गत औषधे खरेदी (औषधे खरेदी) बल्क पद्धतीने मनपा<br>१) सभासदांसाठी मनपा सेवकासाठी | --- | ६ कोटी |
| २) आर्थिक दुर्बल गटासाठी आरोग्य सहाय्य योजनेअंतर्गत (BPL) औषधे खरेदी साथीचे रोग नियंत्रण विविध उपाय योजनेसाठी इ. | --- | ६ कोटी |

**विषय क्र.१५६६**

पुढारी पब्लिकेशन्स प्रा.लि. आयोजित राईज अप सीझन ३ च्या पुणे महिला क्रीडा स्पर्धेचे आयोजन माहे नोव्हेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आले असून प्रायोजकत्वासाठी (पुढारी पब्लिकेशन्स प्रा.लि.) यांना धनादेश / आरटीजीएस द्वारे रक्कम रुपये १५ लाख अर्थसहाय्य क्रीडा विभागाकडील RE27A186 या अर्थशिर्षकातून देणेसाठी पश्चात मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रीडा/१५०४, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५६७**

दि.०१ जून २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कायम झालेल्या विविध पदांवरील सेवकांच्या वेतन मिळणेच्या अर्जाबाबत मा. महानगरपालिका सभा ठराव क्र.५६ दि.३०/५/२०२३ विचारात घेवून, कार्यरत राहिलेल्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील नमूद २७ सेवकांना दि.१/६/२०२३ ते दि.४/१२/२०२३ अखेर मानधन तत्वावरील मुदतवाढ मान्य होणेस व त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.पीएमसी-२०२१/ प्र.क्र.३७७/नवि-२२, दि.०१/०६/२०२३ नुसार वेतनविषयक लाभ देणेस मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि/१५०५, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५६८**

घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील सन २०२४-२५ मधील RE19A139 या अर्थशीर्षकावरील आवश्यक कामांना कमी पडणारी रक्कम रु.३.५० कोटी खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/१५०७, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **घनकचरा व्यवस्थापन विभाग**<br>हडपसर रामटेकडी येथील ७५० मे. टन क्षमतेच्या वेस्ट टू एनर्जी कचरा प्रकल्प येथे विविध विकासकामे करणे.<br>CE19A190 | ३.५० कोटी | --- |
| **नवीन सुचविलेले काम:-**<br>**घनकचरा व्यवस्थापन विभाग** | | |
| पुणे शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची स्वच्छता यांत्रिकी पद्धतीने करणे (भाग अ व भाग ब).<br>RE19A139 | --- | ३.५० कोटी |

**विषय क्र.१५६९**

पुणे शहरातील विविध प्रकारच्या पुलांची देखभाल व दुरुस्ती विषयक कामे करणे या कामासाठी खालीलप्रमाणे रक्कम रु.७६ लक्ष वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/१५०८, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **मुख्य अभियंता (प्रकल्प विभाग)**<br>(FE61A133) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, शिवाजीनगर येथे उड्डाणपूल बांधणे अंतर्गत उड्डाणपुलावर ध्वनीरोधक बसविणे व अभियांत्रिकी कॉलेज मैदान यांना जोडणारा पादचारी पूल बांधणे व इतर तद्नुषंगित कामे करणे | ७६ लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम:-**<br>**मुख्य अभियंता (प्रकल्प विभाग)** | | |
| (RE20B121/R13- 121)<br>पुणे शहरातील विविध प्रकारच्या पुलांची देखभाल व दुरुस्ती विषयक कामे करणे | --- | ७६ लक्ष |

**विषय क्र.१५७०**

वाघोली पाणीपुरवठा योजनेची जलवाहिनी स्थलांतरीत करणे बाबत. या कामी वर्गीकरणाने तरतूद उपलब्ध करून प्रशासकीय मान्यता अन्वये र.रु.२,९१,२१,०००/- (GST, Conti., Labour Insurance, Royalty of WC Charges) इतकी रक्कम आदा करणेसाठी व खालील बाबींस मा.स्थायी समिती यांचे मार्फत मा. मुख्य सभा यांची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पा.पु./१५१०, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

१) वाघोली पाणीपुरवठा योजनेची जलवाहिनी स्थलांतरीत करणे कामी र.रु.२,९१,२१०००/- (GST, Conti., Labour Insurance, Royalty of WC Charges सहित) इतकी रक्कम. (अर्थशीर्षकातील कामाचे नाव: पुणे मनपाने नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावे व २३ गावामध्ये समान पाणीपुरवठा योजना राबविणे (टप्पा-२) ZE16C101/PR1-172 या अर्थशीर्षकावरून वर्गीकरण करून मिळणेस.

२) वाघोली पाणीपुरवठा योजनेची जलवाहिनी स्थलांतरीत करणे कामी र.रु. २,९१,२१०००/- (GST, Conti., Labour Insurance, Royalty of WC Charges सहित) इतकी रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस वर्ग करणेस.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| **मुख्य अभियंता, पाणी पुरवठा विभाग**<br>ZE16C101/PR1-172<br>पुणे मनपाने नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावे व २३ गावामध्ये समान पाणीपुरवठा योजना राबविणे (टप्पा-२) | २९१.२१ लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम:-**<br>**पाणीपुरवठा विभाग पुणे महानगरपालिका** | | |
| वाघोली पाणीपुरवठा योजनेची जलवाहिनी स्थलांतरीत करणे | --- | २९१.२१ लक्ष |

**विषय क्र.१५७१**

१.साने गुरुजी वसाहत दुरुस्तीचे काम करणे. २.राजेंद्र नगर वसाहत दुरुस्तीचे काम करणे. ३.कसबा पेठ ५ नं. कॉलनी दुरुस्ती विषयक कामे करणे या कामांसाठी खालीलप्रमाणे र.रु.२ कोटी वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/१५११, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| **भवन रचना विभाग**<br>सन २०२४- २५ बजेट कोड CE11A129/J1-33<br>शहरात विविध ठिकाणी पुणे मनपाच्या वसाहती बांधणे व विकास कामे करणे. | २०० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम:-**<br>**भवन रचना विभाग** | | |
| १.साने गुरुजी वसाहत दुरुस्तीचे कामे करणे. | --- | १०० लक्ष |
| २.राजेंद्र नगर वसाहत दुरुस्तीचे कामे करणे. | --- | ५० लक्ष |
| ३.कसबा पेठ ५ नं. कॉलनी दुरुस्ती विषयक कामे करणे. | --- | ५० लक्ष |

**विषय क्र.१५७२**

प्रभाग क्र.३ मधील विविध ६ कामे करणे या कामांसाठी खालीलप्रमाणे र.रु.६० लक्ष वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.१/१५१२, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| **परिमंडळ क्र. १ नगररोड वडगावशेरी क्षेत्रिय कार्यालय**<br>अर्थसंकल्पीय अर्थ शिर्षक सन २०२४-२५ चे अंदाजपत्रक मान्य बजेट कोड - CE20A102/A2-2042 (पुणे शहरात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे | ६० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेली कामे:-**<br>**परिमंडळ क्र. १ नगररोड वडगावशेरी क्षेत्रिय कार्यालय** | | |
| १) प्रभाग क्र. ०३ मधील सिद्धार्थनगर येथील विविध गल्ली बोळ कॉंक्रिट करणे. | --- | १० लक्ष |
| २) प्रभाग क्र. ०३ मधील ओव्हाळवस्ती येथे रस्ते विषयक कामे करणे. | --- | १० लक्ष |
| ३) प्रभाग क्र. ० ३ मधील सिद्धार्थनगर वसाहत परिसरात फुटपाथ दुरुस्ती विषयक कामे करणे. | --- | १० लक्ष |
| ४) प्रभाग क्र. ०३ मधील यमुनानगर वसाहत येथील फुटपाथ दुरुस्ती करणे. | --- | १० लक्ष |
| ५) प्रभाग क्र. ०३ मधील संजय पार्क वसाहत परिसरात फुटपाथ विषयक कामे करणे | --- | १० लक्ष |
| ६) प्रभाग क्र. ०३ मधील वैकफिल्ड वसाहत परिसरात फुटपाथ विषयक कामे करणे | --- | १० लक्ष |

**विषय क्र.१५७३**

बावधन खुर्द स.नं. १९ येथील आरक्षित जागेवर प्ले ग्राउंडची (पी.जी.१२) वर एडव्हेंचर पार्क व बालभावनची कामे पूर्ण करणे या कामासाठी खालीलप्रमाणे र.रु.५० लक्ष वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/१५१३, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| **भवन रचना विभाग**<br>बजेट कोड CE27A241/J24-127 र.रु.२५ लक्ष<br>१) खडकवासला येथील खेळाची मैदाने दुरुस्त व सुशोभिकरण करणे | २५ लक्ष | --- |
| CE27A241/J24-134 र.रु.२५ लक्ष<br>२) खडकवासला विधानसभा मतदार संघ बावधन भुसारी कॉलनी स्वा. वि. दा. सावरकर मैदान विकसित करणे. | २५ लक्ष | --- |

| नविन सुचविलेली कामे<br>भवन रचना विभाग | | |
| --- | --- | --- |
| बावधन खुर्द स.नं. १९ येथील आरक्षित जागेवर प्ले ग्राउंडची (पी.जी. १२) वर एडव्हेन्चर पार्क व बालभवनची कामे पूर्ण करणे | --- | ५० लक्ष |

**विषय क्र.१५७४**

पुणे महानगरपालिकेच्या मिळकतीमध्ये दिव्यांग पार्क, स. नं.३/५,३/६ बालेवाडी, पुणे येथील अशासकीय/सामाजिक/स्वयंसेवी संस्था व पुणे मनपा (समाज विकास विभाग) यांच्या संयुक्त प्रकल्पांतर्गत विशेष दिव्यांगांसाठी थेरपी सेंटर सुरु करणे करीता संस्था निवड करणेसाठी उमंग इन्स्टीटयुट ऑफ ऑटिझम अन्ड मल्टीडिसेंबीलीटी रिसर्च सेंटर (सिद्धीविनायक प्रतिष्ठाण संचलित), नवीन कलेक्टर ऑफीसच्या पाठीमागे, शासकिय कॉलनी, बार्शी रोड, लातूर संस्थेमार्फत दिव्यांग पार्क, स.नं. ३/५, ३/६ बालेवाडी, पुणे या ठिकाणच्या दिव्यांगांसाठीच्या केंद्रामध्ये विशेष दिव्यांगांसाठी वेगवेगळया थेरपी, उपचार, समुपदेशन हा उपक्रम राबविणेकरीता मा.महा.आयुक्त यांच्या विषयपत्रातील नमूद अ.क्र.१ ते ६ बाबींस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/समाज विकास/१५१४, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१५७५**

प्रभाग क्र. २९ मधील स. प. महाविद्यालय मैदान याठिकाणी मा. पंतप्रधान यांचे दौऱ्या निमित्त पावसाळी लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) क अन्वये खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता घेणेस व अवलोकनार्थ सादर करणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मलनि/१५१७, दि.१३/०१/२०२५ चे पत्र.

१)प्रभाग क्र. २९ मधील स. प. महाविद्यालय मैदान याठिकाणी मा. पंतप्रधान यांचे दौऱ्यानिमित्त पावसाळी लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे. हे काम अत्यंत तातडीचे असल्याने महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये काम करून घेण्यात आलेले असून त्या पोटी र.रु. १४४३५७५=२१ (सर्व करां सहित) इतका खर्च ZE16B102/D2-575 या अर्थशीर्षकावर करण्यात आला आहे. सदरची बाब मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेपुढे सादर करणेस.

२) पुणे महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ च्या मान्य दरपत्रकानुसार खात्याने खात्री केल्याप्रमाणे मलनिःसारण देखभाल व दुरुस्ती विभागाकडील सन २०२४-२५च्या ZE16B102/D2-575 पुणे शहरातील मलनिःसारण विभागाकडील झोन क्र.५ मधील अचानक उद्भवणाऱ्या कामासाठी या अर्थशीर्षकावर रक्कम खर्ची टाकून बिल अदा करणेस.

३) ठेकेदार मे. सुरज दिनकर आळवे यांनी र. रु. १४४३५७५=२१ (सर्व करां सहित) केलेल्या कामास पश्चात व केलेल्या कामाचे ९५% बिल करारनामा न करता व अनामत रक्कम न घेता अदा करणेस.

४) उर्वरित ५% बिल मा. मुख्य सभेचा ठराव प्राप्त झाल्यानंतर अदा करणेस.

**विषय क्र.१५७६**

पुणे मौजे धनकवडी येथील स.नं.३,७ व ८ येथील मोतेवार गणेश मंदिर ते लोटस सोसायटी पर्यतचा अस्तित्वातील सार्वजनिक वहिवाटीचा रस्ता कलम २१० (१) (ब) अन्वये ९.०० मी. रस्तारुंदी करणेबाबत महापालिका आधिनियम १९४९ चे कलम २१० अन्वये बांधकाम विकास विभागाने सादर केलेल्या नकाशात दर्शविल्यानुसार ९.०० मी. रुंदीची रस्ताप्रमाणरेषा कायम करणेस व जाहिर प्रकटनाद्वारे नागरिकांच्या हरकती/सुचना मागविण्यासाठी मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भूसंपादन/१५२४, दि.१४/०१/२०२५ चे पत्र.

**प्र.नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**